तरुण भारत
बुधवार, १० ऑगस्ट २०२२

# 'वैभवसंपन्न दोडामार्ग' पुस्तकाचे १४ रोजी प्रकाशन

वार्ताहर
दोडामार्ग

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी लिहिलेल्या वैभवसंपन्न दोडामार्ग या पुस्तकाचे प्रकाशन येत्या रविवारी १४ [illegible] दोडामार्ग येथे विविध मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घरघर तिरंगा हे अभियान राबविले जात असून त्यामध्ये गावच्या इतिहासाचे लेखन करायचे आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील इतिहास, भूगोल, नद्या, गड किल्ले, मंदिर, धरण, भौगोलिक स्थळ, भूरुप, पर्यटन स्थळ, जंगल, त्यातील प्राणी, पक्षी, वनस्पती, दोडामार्ग तालुक्यातील शैक्षणिक चळवळीचा इतिहास, साहित्य परंपरा, दशावतार, धालोत्सव, गजा नृत्य, कावी कला, खाद्यपरंपरा, तालुक्यातील दुर्लक्षित लोकसमूह, कृषी क्षेत्रातील आधुनिक पिकांचे उत्पादन या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास करून हे पुस्तक लिहिण्यात आले आहे. त्यामुळे या पुस्तकांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

१४ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता दोडामार्ग येथील महाराजा सभागृहामध्ये या पुस्तकाचे प्रकाशन दोडामार्गचे तहसीलदार अरुण खानोलकर, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, गटशिक्षणाधिकारी निसार नंदाफ, नगराध्यक्ष चेतन चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश दळवी, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक सूर्यकांत परमेकर, शिवसेनेचे बाबुराव धुरी, गोव्यातील इतिहास तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे, हळबे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

या प्रकाशन समारंभाच्या कार्यक्रमामध्ये, दोडामार्ग व्यापारी संघटना, सुशीला देवी चॅरिटेबल मेमोरियल ट्रस्ट, दोडामार्ग तालुका पत्रकार संघ, दोडामार्ग सरपंच संघटना सहभागी होत असून याचा जास्तीत जास्त जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन अंकुश मिरकर, विवेकानंद नाईक, सुहास देसाई, प्रवीण परब यांनी केले आहे.